# प्रकरण – पहिले

---

# विषय प्रवेश

अ ) प्रस्तावना

ब ) गौतम बुद्धांचे संक्षिप्त चरित्र

# प्रकरण - पहिले
# विषय प्रवेश

## अ ) प्रस्तावना

जगामध्ये अगदी प्राचीन काळापासून राज्यशास्त्राच्या अभ्यासाला सुरूवात झाल्याचे दिसून येते. प्रामुख्याने युरोपीय देशांमध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय विचारांची निर्मिती झाली. युरोपीय राजकीय विचार परंपरेमध्ये ग्रीक परंपरा महत्त्वाची आहे. प्राचीन ग्रीसमध्ये नगर राज्यांचा उदय झाला. यामध्ये अथेन्स व स्पार्टा ही नगरराज्ये महत्त्वाची ठरली. प्राचीन अथेन्समध्ये मोठ्या प्रमाणात वैचारिक संघर्ष होत असत व या वैचारिक संघर्षातूनच तेथे वेगवेगळे वैचारिक प्रवाह निर्माण झाले. प्राचीन ग्रीसमध्ये प्रामुख्याने सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल इ. राजकीय विचारवंत होवून गेले व त्यांनी राज्यशास्त्राच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली, त्यांनी राज्यशास्त्राला एक सामाजिक शास्त्र म्हणून अधिष्ठान मिळवून दिले.

युरोपीय देशानंतर प्राचीन भारतातही मोठ्या प्रमाणात राजकीय विचारांची निर्मिती झाली. पाश्चात्य राजकीय विचारांच्या प्रभावशाली परंपरेनंतर दिर्घकाळ चाललेली व कसदार अशी राजकीय परंपरा म्हणून तिचा उल्लेख केला जातो. भारतीय राजकीय विचार परंपरा ही इस्लामिक आणि चीनी परंपरेच्या तुलनेने मुल्यवान आणि श्रेष्ठ आहे. कोणत्याही राजकीय विचारांची निर्मिती ही ज्यावेळी राजकीय संस्था निर्माण होतात, त्यावेळीच होते. प्राचीन भारतात हाडाप्पा संस्कृतीमध्ये राजकीय व्यवस्था कशी होती. याबद्दलची माहिती उपलब्ध नाही, मात्र वैदिक काळामध्ये राजकीय विचारांचा विकास होण्यास सुरूवात झाल्याचे दिसुन येते. या काळात राज्याने अजून प्रादेशिक रूप धारण केले नव्हते परंतु; राजपदाची निर्मिती झाली होती. वैदिक काळात अथर्ववेद हा राज्यशास्त्राचा वेद ठरला. त्यानंतर भगवान महावीर आणि गौतम बुद्ध यांचा उदय झाला. भगवान वर्धमान महावीरांनी जैन तत्त्वज्ञानाची तर गौतम बुद्धांनी बौद्ध तत्त्वज्ञानाची मांडणी केली. गौतम बुद्ध व वर्धमान महावीरांनी अवैदिक तत्त्वज्ञानांचा पुरस्कार केला. वर्धमान महावीरांनी आणि गौतम बुद्धांनीही तत्कालीन सामाजिक, धार्मिक आणि राजकीय व्यवस्थेचे विवेचन करून आपले विचार मांडले.

प्राचीन भारतीय राजकीय विचारांच्या इतिहासामध्ये गौतम बुद्धांनी मोलाची भर घातली आहे. प्राचीन भारतात अर्थशास्त्रीय राजकीय परंपरा ही एक महत्त्वाची राजकीय परंपरा होती. बौद्ध राजकीय परंपरेमध्ये स्वत: गौतम बुद्धांनी व त्यांच्या नंतरच्या शिष्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. बौद्ध राजकीय परंपरेमध्ये राजकीय सिद्धांत, लोकप्रशासन, शासकीय यंत्रणा आणि आंतर-राज्य संबंध इत्यादी गोष्टींवर विस्तृत चर्चा झाली आहे. बौद्ध राजकीय विचारांची सुरूवात गौतम बुद्धापासून झाली, त्यामुळे त्यांना बौद्ध राजकीय विचारांचा जनक असे म्हणावे लागेल. स्वत: गौतम बुद्धांनी कोणत्याही राजकीय ग्रंथाची निर्मिती केली नाही परंतु; त्यांनी आपल्या शिष्यांना, वेगवेगळ्या राजांना, त्यांच्या मंत्र्यांना केलेल्या उपदेशामधून त्यांचे राजकीय विचार प्रतिबिंबित होतात. गौतम बुद्धांचा जन्म शाक्य गणराज्यामध्ये झाला. त्यांनी शाक्य गणराज्याच्या कारभारामध्ये सहभाग घेतला व लोकशाही व्यवस्था जवळून पाहिली. त्यामुळे अर्थातच गौतम बुद्ध लोकशाहीचे समर्थक बनले. गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माची स्थापना केली. त्यांनी स्वत:चे जीवन विषयक तत्त्वज्ञान मांडले. गौतम बुद्धांनी जे तत्त्वज्ञान मांडले ते अहिंसा व सामंजस्यावर आधारित होते. आपण गौतम बुद्धांच्या राजकीय विचारांची विभागणी खालीलप्रमाणे करू शकतो.

१) गौतम बुद्धांचे वर्ण व जातीविषयक विचार.

२) गौतम बुद्धांचा राज्याच्या उत्पत्तीसंबंधीचा सामाजिक कराराचा सिद्धांत.

३) गौतम बुद्ध आणि प्राचीन भारतातील लोकशाही राज्यसंस्थांची कार्यप्रणाली.

४) गौतम बुद्धांचे शांतता आणि आंतर-राज्य सामंजस्यविषयक विचार.

गौतम बुद्धांनी वेदांचे अस्तित्त्व नाकारून वैदिकावर आधारलेल्या, धर्माचा धिक्कार केला. त्यांनी यज्ञयाग, कर्मकांडे, यांच्या रूढी परंपरेस विरोध केला. व ब्राह्मणांचे समाजव्यवस्थेतील वर्चस्व नाकारले. त्याचबरोबर त्यांनी राज्याच्या दैवी उत्पत्तीचाही सिद्धांत नाकारला. गौतम बुद्धांनी स्थापन केलेल्या धम्मसंघाची घटना ही लोकशाही तत्त्वावर आधारित होती. व त्याप्रमाणे धम्मसंघाचे कामकाज चालत असे. गौतम बुद्धांनी स्थापन केलेल्या धम्मसंघाचा पायाच मुळात उदारमतवाद व लोकशाही

तत्त्वावर आधारीत होता व या तत्त्वानुसारच राज्यकर्त्यांनी राज्यकारभार चालवावा असे त्यांना अभिप्रेत होते. गौतम बुद्ध राजांना राज्यकारभार चालविण्यासंबंधी उपदेश करताना म्हणतात, लोकांना निष्कारण त्रास देवू नका; त्यांचा निष्कारण युद्धात बळी देवू नका. त्यामुळे लोकांत असंतोष निर्माण होवून राज्यात फुट पडण्याची शक्यता असते. त्याऐवजी राजाने लोकांना जास्तीत-जास्त अन्नधान्य पिकविण्यासाठी मदत करावी. राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी चोरांचा व दरोडेखोरांचा बंदोबस्त करावा व त्यांना सन्मार्गावर आणण्यासाठी त्यांना राज्यामध्ये रोजगार उपलब्ध करून द्यावा. त्यांना राज्याच्या मालकीची जमीन कसण्यासाठी देवून त्यांचे पुर्नवसन करावे. लोकांना सततच्या युद्धापेक्षा शांतता हवी असते व त्यासाठी राजाने सतत प्रयत्नशील रहावे. गौतम बुद्धांनी "धर्मविजयाची" संकल्पना स्पष्ट केली. त्यांच्या मते, धम्माचा प्रसार हा बळाच्या किंवा धर्माच्या आधारावर केला जावू शकत नाही. गौतम बुद्धांनी चक्रवर्ती राजाची संकल्पना मांडली. जी धम्मचक्रपरिवर्तनावर आधारीत होती. त्यांच्या मते, एखाद्या धर्मसंस्थापकाप्रमाणेच चक्रवर्ती राजा हा समाजमान्य असतो. इत्यादी गौतम बुद्धांचे राजकीय विचार महत्त्वाचे आहेत. प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये गौतम बुद्धांच्या या राजकीय विचारांची सुसंगतपणे आणि विस्तृतरित्या मांडणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**विषय का निवडला -**

प्राचीन भारताच्या इतिहासामधील गौतम बुद्ध हे एक अत्यंत क्रांतिकारक व सामाजिक सुधारणावादी विचारवंत होते. भारतीय राजकीय विचारांची तर्कशुद्धरित्या सर्वप्रथम मांडणीची सुरूवात गौतम बुद्धांपासून होते. परंतु आजपर्यंत कोणत्याही राजकीय विश्लेषकांनी, अभ्यासकांनी त्यांच्या या राजकीय विचारांचे संशोधन अथवा विश्लेषण केले नाही. त्याचबरोबर कोणत्याही विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामध्ये आजपर्यंत गौतम बुद्धांचा स्वतंत्ररित्या राजकीय विचारवंत म्हणून समावेश करण्यात आलेला नाही. असे घडण्यास प्रामुख्याने दोन घटना कारणीभूत ठरल्या आहेत.

१) गौतम बुद्धांच्या राजकीय विचारांची सुसंगतपणे आणि विस्तृतरित्या मांडणी कोठेच करण्यात आली नाही.

२) अगदी प्राचीन काळापासून गौतम बुद्धांकडे केवळ एक धार्मिक विचारवंत व तत्त्वज्ञानी म्हणूनच पाहण्यात आले आहे. त्यामुळे स्वत: गौतम बुद्ध व त्यांचे विचार आणि तत्त्वज्ञान एक धार्मिक मिथ्थक बनले.

गौतम बुद्धांनी इ.स. पूर्व ६ व्या शतकामध्ये आपल्या विचारांची मांडणी केली. राजकीय विचारांच्या दृष्टीने पाहता त्यांनी मांडलेला सामाजिक कराराचा सिद्धांत, राज्याच्या उत्पत्ती संबंधाचा सिद्धांत, त्यांचे लोकशाही गणराज्याविषयक विचार, वर्ण व जातीव्यवस्था विषयक विचार, शांतता व सामंजस्य विषयक विचार महत्त्वपूर्ण आहेत. जगामध्ये पहिल्यांदा सामाजिक कराराचा सिद्धांत गौतम बुद्धांनी मांडला असे म्हणता येईल. परंतु; गौतम बुद्धांच्या या राजकीय विचारांकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे सदर शोधप्रबंधामध्ये गौतम बुद्धांच्या वरील राजकीय विचारांची योग्यपणे, सुसंबद्ध मांडणी करण्याचा माझा मानस आहे.

त्याचबरोबर आज समाजामध्ये अनीति, अन्याय, अत्याचार फैलावताना दिसत आहे. साहजिकच यास समाजकारण आणि राजकारण करणाऱ्यांची स्वार्थीवृत्ती कारणीभूत आसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे साहजिकच समाजकारण व राजकारण म्हणजे काय? त्यांचा उद्देश व प्रेरणा काय असली पाहिजे? समाजकारण आणि राजकारण करणाऱ्यांची वृत्ती कशी असावी, हे सांगण्याची गरज आज निर्माण झाली आहे. या गरजेची पुर्तता आपण गौतम बुद्धांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांची मांडणी करणे शक्य आहे, असे मला वाटते. म्हणून प्रस्तुत शोधप्रबंधासाठी मी सदर विषयाची निवड केली आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये -**

प्रस्तुत शोधप्रबंधाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) गौतम बुद्धांच्या राजकीय विचारांची सुसंगतपणे आणि विस्तृतरीत्या मांडणी करणे.

२) गौतम बुद्धांचे वर्ण व जातीविषयक विचार समजून घेणे.

३) गौतम बुद्धांच्या सामाजिक कराराच्या सिद्धांताच्या आधारे राज्यसंस्थेच्या निर्मितीच्या सिद्धांताचा अभ्यास करणे.

४) गौतम बुद्धांचे लोकशाही गणराज्यविषयक विचार समजून घेणे.

५) गौतम बुद्धांच्या राजाचे व राज्याची कर्तव्ये आणि कार्यपद्धती विचारांचा अभ्यास करणे.

६) गौतम बुद्धांच्या राजकीय विचारांची समकालीन सामाजिक आणि राजकीय परिस्थितीच्या संदर्भात प्रस्तुतता तपासून पाहणे.

**अभ्यासाची साधने -**

बौद्ध धर्म व जैन धर्मही वैदिक धर्मास ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकात दिली गेलेली दोन प्रमुख आव्हाने होत. या दोन धर्मांच्या बुद्धिमान अनुयायांनी बरेच विस्तृत वाङ्‌मय निर्माण केले आहे. त्यामधून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रासंदर्भातील नवे सिद्धांत प्रतिपादिले आहेत. बौद्ध राज्यविचारांच्या अभ्यासासाठी आपणास त्रिपिटक ग्रंथ व जातककथांचा अभ्यास करावा लागतो. त्रिपिटकापैकी सूक्त भाग व निकायापैकी दीर्घ व मध्यम व संयुक्त निकाय (कथासंग्रह), जातक कथा, अठ्ठकथा, नागार्जुनाचे बुद्धचरित्र, श्रीहर्षाचे नागानंद हे नाटक राज्यविचारांच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. वरील पालीग्रंथाशिवाय आर्यशुराची जातकमाला, अश्वघोषाचे सौदरानंद काव्य व बुद्धचरित्र काव्य हेही महत्त्वाची आहेत. काही तिबेट ग्रंथ (विशेषत: बुद्धचरित्र) देखील राजकीय विचारांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.[१] प्रस्तुत अभ्यासासाठी वरील बौद्ध साहित्याचा वापर करण्यात येणार आहे.

बौद्ध धर्माविषयी जगामध्ये मोठ्या प्रमाणात अभ्यास झाला आहे. विपुल लेखन करण्यात आले. या साहित्याचाही संदर्भ घेतला जाईल. यामध्ये प्रामुख्याने डॉ. हेरमन ओल्डेनबर्ग यांनी आपल्या ''बुद्धा : हिज लाईफ, हिज डॉक्टरीन, हिज ऑर्डर'' या ग्रंथामध्ये गौतम बुद्धांच्या चरित्राविषयी अत्यंत मुलभूत विवेचन केले आहे. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या ''भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म'' व

धर्मानंद कोसंबी यांनी ''बुद्धलीला'' या गौतम बुद्धांच्या चरित्रात्माक ग्रंथामध्ये महात्मा गौतम बुद्ध यांच्या विषयी विस्तृत विवेचन केले आहे. धर्मानंद कोसंबी यांनी ''जातककथासंग्रह'', ''भगवान बुद्ध जीवन आणि दर्शन'' हे गौतम बुद्धांच्याविषयी महत्त्वाचे ग्रंथ लिहले, त्यांचाही अभ्यास केला जाईल. दुर्गा भागवत यांनी ''जातककथा'' संपादित केल्या आहेत. डॉ. सिन्धू डांगे यांनी ''बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान'' व डॉ. भास्कर भागचंद्र यांनी ''भारतीय संस्कृतीला बौद्ध धर्माचे योगदान'' या ग्रंथाची निर्मिती केली, सदर ग्रंथही प्रस्तुत अभ्यासासाठी वापरण्यात येणार आहेत.

गौतम बुद्धांच्या राजकीय विचारांच्या दृष्टीने डॉ. आळतेकर ए. एस. यांनी आपल्या "State and Government in Ancient India" या पुस्तकात, डॉ. बेनीप्रसाद यांनी "The State in Ancient India" आणि "Theory of Government in Ancient India" या ग्रंथामध्ये महत्त्वाची मांडणी केली आहे. त्याबरोबर डॉ. घोषाल यु. एन. यांनी "A History of Indian Political Ideas", डॉ. जायस्वाल के. पी. यांनी "The Hindu Polity" या ग्रंथात आणि डॉ. डी.डी. कोसंबी यांनी "An Introduction to the Study of Indian History" व डॉ. सालेतोर बी.ए. यांनी आपल्या "Ancient Indian Political thought and Institution" या ग्रंथात बौद्ध राजकीय विचारांची मांडणी केली आहे. सदर पुस्तके प्रस्तुत अभ्यासासाठी उपयुक्त आहेत. डॉ. गर्दे दि. का. यांचे ''प्राचीन भारतीय राज्यविचार'', ''प्राचीन भारतीय राजनीती'' डॉ. रामशरण शर्मा यांचे, ''प्राचीन भारतातील राजकीय विचार आणि संस्था'' व डॉ. हेमचंद्र रायचौधुरी यांचे, ''प्राचीन भारताचा राजकीय इतिहास'' ही पुस्तके महत्त्वाची आहेत.

त्याचबरोबर मासिके, वर्तमानपत्रातील गौतम बुद्ध व त्यांच्या धम्माविषयी प्रकाशित झालेले लेख यांचाही आणि इंटरनेटवरील संकेतस्थळांचा वापर केला आहे.

**संशोधन पद्धती :**

सदर शोधप्रबंधाच्या अभ्यासासाठी ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने "त्रिपिटक ग्रंथ" आणि "धम्मपद" ग्रंथ याचा वापर केला आहे. वरील साधनांचा प्राथमिक साधने म्हणून वापर करण्यात आला आहे. व त्याअधारे गौतम बुद्धांच्या राजकीय विचारांची व्यवस्थितपणे, तर्कशुद्धरित्या व सुसंगतपणे मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

त्याचबरोबर गौतम बुद्धांविषयी चरित्रग्रंथांचा, जातककथा संग्रहांचा, तत्त्वज्ञानविषयक ग्रंथाचा, राजकीयदृष्ट्या विश्लेषणात्मक पुस्तकांचा दुय्यम साधने म्हणून वापर करण्यात आला आहे. याशिवाय वेगवेगळ्या मासिकांमधून, वर्तमानपत्रामधून प्रकाशित झालेल्या शोधनिबंधाचा आणि इंटरनेटवरील काही संकेतस्थळांचा वापर केला आहे.

**ब ) गौतम बुद्धांचे संक्षिप्त चरित्र :**

"गौतम बुद्धांचे मुळ व्यक्तित्त्व एका ऐतिहासिक महापुरूषाचे व्यक्तित्त्व होते. त्यांच्या जीवन काळात कोणीच त्यांच्या जीवन घटनांचा उल्लेख व्यवस्थित केला नाही. पालि त्रिपिटकात ज्या काही घटना संकलित झाल्या त्याही सुव्यवस्थित नाहीत. तरीपण गौतम बुद्धांचा प्रामाणिक जीवनवृत्तांत प्राप्त करणे सुलभ नाही. उत्तर काळात त्यांच्या ऐतिहासिक व्यक्तित्त्वावर लोकोत्तर व्यक्तित्त्वाचे आच्छादन जोडले गेले आणि अशा रीतीने उरलेली ऐतिहासिकता धूसर झाली. यासाठी गौतम बुद्धांच्या जीवन घटनांचे सावधानतापूर्वक ग्रहण करणे आवश्यक आहे."[२] असे मत डॉ. भागचन्द्र भास्कर यांनी व्यक्त केले आहे.

बौद्धधर्माच्या इतिहासामध्ये स्वत: गौतम बुद्ध, त्यांनी सांगितलेला धम्म व धम्मप्रसारासाठी स्थापन केलेला धम्मसंघ या तीन गोष्टींना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. गौतम बुद्धांच्या चरित्राविषयी समकालीनांनी लिहिलेली माहिती उपलब्ध नाही. परंतु; दीघनिकायातील महापरिनिव्वाण आणि तेविज्ज सुत्त, मज्जिम निकायातील बोधिराजकुमार, सेल आणि रट्टपाल सुत्त, सुत्तनिकायातील धम्मचक्कप्पवत्तन; चन्द

आणि जरासुत्त, अड्:गुत्तर निकायातील पजापति पब्बज्जासुत्त, खुद्दक निकायातील सुत्तनिपात, धम्मपद, थेरी-थेरी गाथा, निदान इत्यादी, विनयपिटकातील चुल्लवग व महावग्ग तसेच अनुपिटकातील महावंस इत्यादी ग्रंथामधून गौतम बुद्धांच्या जीवनचरित्रा विषयक माहीती मिळते. याशिवाय उत्तरकाळामध्ये बुद्ध जीवनावर अनेक ग्रंथ लिहले गेले. यामध्ये महावस्तु, ललितविस्तार अभिनिष्क्रमणसुत्र, जातककथा, बुद्धचरित इत्यादी ग्रंथ महत्त्वपूर्ण आहेत.

गौतम बुद्धांचा जन्म शाक्य गणराज्यात झाला. गौतम बुद्धांनी बौद्ध धम्माची स्थापना करून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा मार्ग शोधून काढला. त्यामुळे गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान अजरामर ठरले आहे.

**शाक्य गणराज्य व त्याच्या भौगोलिक परिसीमा -**

गौतम बुद्धांचा जन्म शाक्य गणराज्यातील शाक्य कुळात झाला. हिमालयातील उतरणीवर, नेपाळच्या दक्षिणेस अयोध्या (अवध) प्रांताच्या ईशान्य भागातून राप्ती या नदीच्या प्रवाहमार्गाच्या मध्यभागास शाक्य लोकांचे महाजनसत्ताक असे छोटेसे राष्ट्र होते. हे शाक्य लोक आपण इक्ष्वाकू कुलातील आदित्यगोत्री क्षत्रिय आहोत असे मानीत.[३]

शाक्यांच्या छोट्या राष्ट्राची पूर्वेकडील सीमा रोहिणी या नदीने निश्चित केली होती. (रोहिणी हे या नदीचे नाव जवळ-जवळ अडीच हजार वर्षानंतरही तेच कायम राहिले आहे. ही नदी राप्ती या नदीला गोरखपूरजवळ मिळते) पश्चिमेला व दक्षिणेला शाक्य राज्याची सीमा राप्ती या नदीपर्यंत भिडलेली होती. राप्ती ही नदी बौद्ध वाड्:मयात बऱ्याचदा 'अचिरवती' या नावाने येते. शाक्य राष्ट्राच्या दक्षिणेस व पश्चिमेस महाप्रतापी कोसल राजा प्रसेनजिताचे राज्य होते. शाक्य हे राष्ट्र पूर्वी स्वतंत्र म्हणून गणले जात असे. पण भगवान बुद्धांच्या काळी या राज्याचे स्वातंत्र्य नष्ट होऊन त्याची गणना कोसल राज्याचे मांडलिक राज्य म्हणून केली जाऊ लागली.[४] गौतम बुद्धांच्या काळी शाक्यांची लोकसंख्या जवळपास ऐंशी हजार होती व राज्याचा विस्तार पंधराशे चौरस मैल होता.[५]

**गौतम बुद्धांचा जन्म -**

गौतम बुद्धांच्या जन्म व महापरिनिर्वाण या कालावधीसंदर्भात विचारवंतामध्ये एकमत नाही. काही विद्वानांच्या मते, गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणाचा कालावधी हा इ.स. पूर्व ४८७ ते इ.स. पूर्व ४७७ च्या दरम्यास असावा. वरील परंपरेनुसार त्यांचा जन्म इ.स. पूर्व ५६७ ते इ.स. पूर्व ५५७ च्या दरम्यास झाला असावा कारण बुद्धांचे महापरिनिर्वाण त्यांच्या वयाच्या ८०व्या वर्षी झाले होते. दुसऱ्या श्रेणीत श्रीलंकेची परंपरा येते; त्यानुसार बुद्धांचे महापरिनिर्वाण इ.स. पूर्व ५४४ आणि जन्म इ.स. पूर्व ६२४ मध्ये झाला असे म्हटले आहे.[६] तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गौतम बुद्धांचा जन्म इ.स. पूर्व ५६३ व्या वर्षी वैशाख पौर्णिमेला झाला असे म्हटले आहे.[७] ओल्डेनबर्ग यांनी हा परस्पर विरोधी वाद टाळण्यासाठी गौतम बुद्धांचा जन्म इ.स. पूर्व ६व्या शतकाच्या मध्यावर झाला असे म्हटले आहे [८] व जवळ-जवळ सर्व इतिहासकार या मतावर ठाम आहेत.

गौतम बुद्धांचे मूळ नांव सिद्धार्थ होते तर गौतम हे सिद्धार्थाचे गौत्र नाव आहे.[९] सिद्धार्थ गौतमाचा जन्म नेपाळमधील कपिलवस्तूच्या निकट 'लुम्बिनी' वनात झाला. नंतर येथे सम्राट अशोकाचे अभिलेख (शिलालेख) प्राप्त झाले आहेत. त्यावर "हिद बुधे जाते साक्यमुनीति हिद भगवा जातेती" (येथे शाक्यमुनी बुद्ध जन्मले) असे कोरले आहे. यावरून गौतम बुद्धाच्या जन्मगावास पुष्टी मिळते. परंतु; अलीकडेच श्री. के.एम. श्रीवास्तव यांच्या निर्देशनाखाली झालेल्या पीपरहवाच्या उत्खननातून असे दिसून आले आहे की, कपिलवस्तु नेपाळमध्ये नसुन भारताच्या सीमेतच होती. येथे मिळालेल्या मुद्रांवर 'सिरि ओंम देवपुत्र विहारे कपिलवस्तु महाभिक्खुसंघस्स" असे निर्देश आहेत व या मुद्रा अशोकाच्या लेखाच्या खालच्या भागात मिळाल्या आहेत.[१०] बुद्धाचे वडील क्षत्रिय राजवंशी गौतम[११] गौत्री शुध्दोदन[१२] होते. आणि आईचे नांव माया अथवा महामाया होते. ती कोलीय वंशाची[१३] राजकुमारी होती.

गौतम बुद्ध जन्मत:च महापुरूष लक्षणांनी अंकित होते. या लक्षणांना पाहून ज्योतिर्विदांनी म्हटले होते "इमेहि चक्कवती, पब्बज्जमानो बुद्धो"[१४] (जर तो संसारी

जीवनात राहीला तर चक्रवर्ती सम्राट होईल; पण गृहत्याग करून त्याने संन्यास घेतला तर तो सम्यक् सम्बुद्ध असा बुद्ध होईल) गौतम बुद्धांच्या जन्मानंतर अवघ्या सातव्याच दिवशी महामायादेवीचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांचा सांभाळ मावशी महाप्रजापति गौतमीने केला.

**बालपण व शिक्षण -**

सिद्धार्थ चालू आणि बोलू लागल्यानंतर शाक्य कुळातील रीतीरिवाजाप्रमाणे त्याच्यावर सर्व विधी करण्यात आले आणि वयाच्या आठव्या वर्षापासून सिद्धार्थाच्या विद्याभ्यासास सुरूवात झाली. शुध्दोदन राजाच्या दरबारातील राम, ध्वज, लक्ष्मण, मंत्री, कौंडिण्य, भोज, सुयाम आणि सुदत्त या षडंगवेदधारी आठ विद्वान ब्राह्मणांकडून गौतमाने प्रारंभीचे शिक्षण पूर्ण केले. प्रारंभीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शुध्दोदनाने उदिच्च देशातील थोर कुळात जन्मलेल्या व उच्च परंपरा असलेल्या सब्बमित्ताला[१५] गौतमाच्या पुढील शिक्षणासाठी बोलावून घेतले. तो भाषाशास्त्र, व्याकरणशास्त्र, वेद, वेदांगे आणि उपनिषदे या सर्वात पारंगत होता. सब्बमित्तलाच्या हाताखाली सिद्धार्थ गौतमाने तत्कालीन सर्व दर्शनशास्त्रे आत्मसात केली. हा गौतमाचा दुसरा गुरू होय. याशिवाय पुढे सिद्धार्थाने आलारकालाम व त्याचा शिष्य भारद्वाज यांच्याकडून ध्यानधारणेची विद्या संपादित केली होती.[१६] राजा शुध्दोदनाने सिद्धार्थाच्या बौद्धिक विकासाबरोबरच क्षत्रियाला आवश्यक असणाऱ्या युद्धकौशल्याचेही शिक्षण सिद्धार्थास दिले.

सिद्धार्थ दयाशील प्रवृत्तीचा होता. माणसाने माणसाची पिळवणूक करावी हे त्यास आवडत नसे. गौतमाचे बालपण परमोच्च प्रेमभावनेने व्यापलेले होते.[१७]

**तारूण्य आणि विवाह -**

राजपुत्र सिद्धार्थ स्वभावत:च वैराग्यवृत्तीचा होता. असितमुनींनी केलेल्या भविष्यवाणीच्या भीतीपोटी राजा शुध्दोधनाने त्यांना लहानपणापासूनच अतिशय सुखात ठेवले होते. सिद्धार्थास राहण्यासाठी तीन मोठमोठाले राजमहल बांधले होते. यातील एक पावसाळ्यासाठी, दुसरा हिवाळ्यासाठी तर तिसरा उन्हाळ्यासाठी होता.[१८] या तीन्ही

राजमहलामध्ये विलासी जीवनाला उत्तेजक अशा सर्व प्रकारच्या साधनांनी सुसज्ज करण्यात आले होते. अतिसुंदर युवतींनीयुक्त अशा अंत:पुराची व्यवस्था करण्यात आली होती. सिद्धार्थाच्या दिमतीस गायक, नर्तकी ठेवून त्यास नजरकैदच केले होते असे म्हणावे लागेल. परंतु या सर्व विलासी आणि चैनीच्या जीवनाविषयी गौतमाच्या मनामध्ये अनासक्ती आणि वैराग्याची भावना निर्माण होत असे.

गौतम बुद्धाचा विवाह अगदी तारूण्याच्या सुरवातीसच दंडपाणीची मुलगी यशोधरा हिजबरोबर लावण्यात आला. यशोधरेसच गोपा आणि मगजा अशी इतर नावे आढळून येतात.[१९] यशोधरेस गौतमापासून राहुल नावाचा एक मुलगा झाला. राजा शुध्दोदनाने या सर्व गोष्टी करण्यामागे मुख्य हेतु हा होता की, सिद्धार्थ गौतमाने संसारी जीवनामध्ये रमून चक्रवर्ती राजा बनावे. परंतु शुध्दोदनाची ही अपेक्षा फोल ठरली. तो सिद्धार्थ गौतमास संसारत्याग करण्यापासून वाचवू शकला नाही.

**शाक्य संघात प्रवेश व संघाशी संघर्ष -**

शाक्य संघातील प्रवेश ही एक सिद्धार्थ गौतमाच्या जीवनातील महत्त्वाची घटना होती. शाक्य संघातील वयाची २१ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक तरूणाला शाक्य संघाची दिक्षा घेवून सभासद व्हावे लागत असे.[२०] त्यानुसार वयाच्या २१व्या वर्षी सिद्धार्थाने शाक्य संघाची दिक्षा घेवून सभासदत्व स्वीकारले. शाक्यांचे एक सभागृह होते, त्यास 'संथागार'[२१] असे म्हणत. त्यामध्ये शाक्यसंघाच्या सभा भरत असत. ते कपिलवस्तु नगरामध्ये होते. शाक्य संघाच्या सभासदाला पुढील कर्तव्ये[२२] पार पाडावी लागत असत.

१) शाक्य संघाच्या हितसंबंधाचे संरक्षण तनमनधनपूर्वक करणे.

२) संघाच्या सभांना कधीही गैरहजर राहू नये.

३) कोणत्याही शाक्य नागरिकांच्या वर्तनामध्ये एखादा दोष आढळून आल्यास, कोणत्याही प्रकारची भीती किंवा भीड न बाळगता उघडपणे बोलून दाखविणे.

४) एखाद्या सभासदावर दोषारोप ठेवला असता रागास न जाता अपराधी असल्यास, त्याने आपला दोष मान्य करावा किंवा निरपराधी असल्यास तसे सांगावे.


SHRI. B... ...KAR LIBRARY SHIVAJI ... KOLHAPUR

शाक्य संघाने सभासदांच्या कर्तव्याबरोबरच सभासदांच्या अपात्रतेचेही[२३] काही निकष पुढीलप्रमाणे ठरविले होते.

१) एखाद्या सभासदाने बलात्कार केल्यास त्याला अपात्र ठरविण्यात येईल.

२) एखाद्या सभासदाने हत्या केली तर त्याला त्या पदावर राहता येणार नाही.

३) एखाद्या सभासदाने एखाद्या खटल्यामध्ये खोटी साक्ष दिली व त्याच्यावरील तो आरोप सिद्ध झाला तर त्याला आपल्या पदावर राहता येणार नाही, तो अपात्र समजण्यात येईल.

सिद्धार्थ गौतम या शाक्य संघाचा एक जबाबदार, एकनिष्ठ व बाणेदार असा सभासद बनला. स्वत:च्या खाजगी कामात तो जेवढे लक्ष देत असे तेवढेच लक्ष तो संघाच्या कार्यात घालीत असे. संघाचा सभासद म्हणून त्याचे वर्तन आदर्श असे होते.

परंतु; शाक्य संघाचा सभासद झाल्यापासून फक्त आठव्या वर्षीच सिद्धार्थ गौतमाचे आणि शाक्य संघाचे रोहिणी नदीच्या पाणी वाटपावरून मतभेद झाले. व हीच घटना सिद्धार्थ गौतमाच्या जीवनास कलाटणी देणारी ठरली. रोहिणी नदीच्या पाणी वाटपावरून शाक्य व कोलीय ही राज्ये परस्पर विरोधी युद्धासाठी उभी ठाकली असता सिद्धार्थ गौतमाने शाक्यसंघामध्ये सदर युद्धास विरोध केला व परस्पर वाटाघाटीच्या मार्गाने प्रश्न सोडवावा अशी मागणी केली.[२४] परंतु; बहुमत गौतमाच्या विरोधामध्ये गेले. त्यावेळी सिद्धार्थ गौतमाने सदर युद्धामध्ये सहभागी होण्यास नकार दिला. मात्र प्रत्येक शाक्य युवकाने युद्धामध्ये सहभागी झाले पाहिजे असा त्यावेळी शाक्यसंघाचा नियमच होता. अन्यथा शाक्यसंघाच्या रोषाला बळी पडून संघ देईल ती शिक्षा भोगण्यास तयार राहीले पाहिजे. अर्थातच सिद्धार्थ गौतमाने युद्धामध्ये सहभागी होण्यास नकार दिल्याने शाक्य संघाने त्यास शिक्षा देण्याचे ठरविले व त्यानुसार त्याच्यापुढे तीन पर्याय ठेवले.[२५]

१) सैन्यात दाखल होवून युद्धात सामील होणे.

२) देहान्त किंवा देशत्याग करणे.

३) आपल्या कुटूंबियावर सामाजिक बहिष्कार ओढवून त्यांच्या मालमत्तेची जप्ती होवू देण्यास तयार होणे.

सिद्धार्थ गौतमाने वरीलपैकी देहान्त किंवा देशात्यागाची तयारी दर्शविली, कारण सैन्यात दाखल होवून युद्धात सामील होण्यास त्याचा मुलत:च विरोध होता आणि आपल्या कुटूंबियांवर सामाजिक बहिष्कार टाकून त्यांची मालमत्ता जप्त केली जावी, यास सिद्धार्थ गौतमाचा विरोध होता. कारण आपल्या स्वत:च्या चुकीसाठी त्यांना शिक्षा भोगावी लागणे हे गौतमास मान्य नव्हते.[२६]

**सिद्धार्थ गौतमाचे महाभिनिष्क्रमण -**

सिद्धार्थ गौतमाने शाक्य संघाने दिलेल्या देहत्याग किंवा देशात्यागाच्या शिक्षेचा स्वीकार केला परंतु; शाक्यसंघावर त्यावेळी प्रत्यक्ष कोसलाधिपतीचे राज्य होते. त्यामुळे त्याच्या परवानगीशिवाय या शिक्षा देण्याची परवानगी शाक्यसंघास नव्हती[२७] व जर का सिद्धार्थ गौतमाने शाक्यसंघाने दिलेल्या शिक्षेचे पालन करून देहत्याग किंवा देशात्याग केला ही घटना कोसलाधिपतीला समजली तर शाक्यसंघावर त्याचा रोष ओढविण्याची शक्यता होती. तेव्हा यातून मार्ग काढण्यासाठी सिद्धार्थ गौतमाने परिव्रज्या धारण करून देशत्याग करण्याचे ठरविले[२८] व त्यानुसार आपल्या माता-पिता, पत्नी आणि स्वकीय यांची परवानगी घेवून कपिलवस्तु आश्रमातील भारद्वाजाच्या हस्ते परिव्रज्या धारण केली आणि तो परिव्राजक (संन्याशी) बनुन ज्ञानाच्या शोधार्थ बाहेर पडला, हेच सिद्धार्थ गौतमाचे ''महाभिनिष्क्रमण'' होय.

सिद्धार्थ गौतमाने जरा, व्याधी, मरण या गोष्टी पाहिल्यानंतर मध्यरात्री पलायन करून प्रव्रज्या घेतली नव्हती तर शाक्यसंघाने ठोठावलेल्या शिक्षेचा एक भाग म्हणून आणि शाक्य संघाच्या हितासाठी घेतलेल्या निर्णयाचा एक परिपाक होती. गौतम बुद्धांनी प्रव्रज्या ही मध्यरात्री पलायन करून घेतली नव्हती तर ती जाहीरपणे आपल्या माता-पित्याची, पत्नीची परवानगी घेवून घेतली होती, हे माज्झिमनिकायातील बौधिराजकुमार सुक्तावरून स्पष्ट होते.[२९]

वरीलप्रमाणे सिद्धार्थ गौतमाने गृहत्याग करून प्रव्रज्या धारण केली असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. भागचंद्र भास्कर यांचे मत असले तरी त्यास बौद्ध धर्माच्या अभ्यासकांनी मान्यता दिलेली नाही. त्यांच्या मतानुसार गौतमाच्या प्रव्रज्या

धारण करण्यास परंपरेने सांगितलेले कारणच [३०] जबाबदार आहे, ते म्हणजे, ऐके दिवशी सिद्धार्थ गौतमाने आपल्या पित्याची राजधानी पहावी व राजोद्यानात फिरून यावे अशी इच्छा व्यक्त केली. व त्यानुसार तो रथामध्ये बसून राजवाड्याबाहेर पडला. तेव्हा वाटेत त्यांच्या पाहण्यामध्ये एक खंगलेला मनुष्य आला. त्या माणसास पाहून सिद्धार्थाने आपला सारथी छन्नास, त्याविषयी विचारले, तेव्हा छन्नाने तो एक म्हातारा मनुष्य आहे व प्रत्येक मनुष्यास एक ना एक दिवस या वृद्धावस्थेतून जावेच लागते असे उत्तर दिले. तेव्हा सिद्धार्थ गौतमाने तात्काळ छन्नास रथ राजवाड्याकडे परत नेण्यास सांगितले.

पुन्हा ऐके दिवशी सिद्धार्थ गौतम उद्यानामध्ये फिरण्यास निघाले असता, त्यांना वाटेत एक जर्जर रोगी भेटला. त्यास पाहून सिद्धार्थाने सारथ्यास त्याच्याविषयी विचारले तेव्हा, छन्न म्हणाला, तो एक व्याधीग्रस्त असा आजारी मनुष्य असुन तो व्याधीमुळे अशक्त बनला आहे. सिद्धार्थाने पुन्हा छन्नास रथ राजवाड्यामध्ये परत नेण्याची आज्ञा दिली.

पुन्हा काही दिवसानंतर सिद्धार्थ गौतम फिरण्यासाठी जात असताना, त्यांना वाटेवरून एक प्रेतयात्रा जाताना दिसली. त्याविषयी गौतमाने छन्नास विचारले असता, छन्न म्हणाला, ही एक प्रेत यात्रा आहे व त्या शिबिकेवर जो मनुष्य आहे तो गतप्राण झाला आहे, व ते प्रेत आहे यास मरण म्हणतात. या प्रेतयात्रेत सहभागी झालेले हे सर्व लोक त्याला स्मशानामध्ये जाळण्यासाठी किंवा पुरण्यासाठी नेत आहेत. आणि हा मृत्यू प्रत्येक माणसाला अटळ आहे.

सिद्धार्थ गौतमाच्या मनावर वरील तीन घटनांचा परिणाम झाला व त्यावर गौतमाने चिंतन केले. ''जरेचा विचार केला असता मनुष्याचा तारूण्यमद नष्ट होतो. व्याधीमुळे बलमद निघून जातो. आणि मृत्यूच्या विचाराने आयुष्यमद नाहीसा होतो. जर का हे तिन्ही ही मद नष्ट झाले तर आम्हाला आयुष्यामध्ये आनंद कसा वाटेल?''[३१] हा महत्त्वाचा प्रश्न सिद्धार्थ गौतमापुढे उभा राहिला. व या प्रश्नाचे उत्तर शोधून काढण्यासाठी सिद्धार्थ गौतम एके दिवशी मध्यरात्री राजवाड्यातून आपला आवडता

घोडा कंठ व सेवक छन्न यांच्यासह गृहत्याग करून बाहेर पडला व जरा, व्याधी आणि मरण यांच्यापासून मनुष्याची कशी सुटका करून घेता येईल, व त्या उत्पन्न होण्याची कारणे कोणती? या ध्यासापोटी संसारत्याग करून प्रव्रज्या स्वीकारली, यास सिद्धार्थ गौतमाचे 'महाभिनिष्क्रमण' असे म्हणतात.[३२]

**राजा बिंबिसाराला उपदेश आणि नवी समस्या -**

सिद्धार्थ गौतमाने गृहत्याग करून परिव्रज्या धारण केल्यानंतर कपिलवस्तु सोडले व ते मगध देशाची राजधानी राजगृह येथे गेले. तेथे त्यांची भेट राजा बिंबिसार बरोबर झाली.[३३] राजा बिंबिसाराने सिद्धार्थ गौतमाला पुन्हा संसारामध्ये परतून राजपद धारण करण्याविषयी विनंती केली. परंतु निश्चिंयी गौतमाने त्यास नकार दिला. त्याचबरोबर राजा बिंबिसारला राजा व राजपद या अंगाने उपदेश केला तो अतिशय महत्त्वाचा आहे. "जगातील कलहामुळे मी घायाळ झालो आहे. आणि शांतता मिळविण्याच्या इच्छेने मी बाहेर पडलो आहे. या दु:खाचा अंत करण्याऐवजी या पृथ्वीचेच राज्य काय पण स्वर्गलोकाच्याही राज्याची अपेक्षा मी करणार नाही."[३४] या गौतमाने राजा बिंबिसारला दिलेल्या उत्तरावरून गौतमाच्या मनामध्ये ऐहिक सुखाविषयी निर्माण झालेली. वैराग्याची भावना आणि खऱ्या ज्ञानाच्या शोधार्थ मनामध्ये केलेला ठाम निश्चय दिसून येतो.

परंतु काही कालावधीमध्येच कोलिय आणि शाक्य यांच्यामध्ये रोहिणी नदीच्या पाणी वाटपावरून समेट घडून आल्याची व तो प्रश्न एका लवादाच्या निर्णयानुसार सोडविला गेल्याची वार्ता गौतमास समजली.[३५] त्यामुळे सिद्धार्थ गौतमासमोर पुन्हा एक नवाच प्रश्न निर्माण झाला. तो म्हणजे आपण ज्यासाठी प्रव्रज्या घेतली तो प्रश्न तर सुटला मग आपण यापुढे प्रव्रज्या चालू ठेवावी का नको? विचारांती गौतमाने प्रव्रज्या अशीच पुढे चालू ठेवण्याचा निर्धार केला. त्यांच्या मते, "युद्धसमस्या ही एक कलह समस्या आहे. असे कलह राज्या-राज्यात, राष्ट्रा-राष्ट्रात, माता-पुत्रात, पिता-पुत्रात, भावा-बहिणीत आणि सहकाऱ्यांत देखील चालू असतात. राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष हा प्रसंगोत्पात असतो; परंतु वर्गावर्गातील संघर्ष हा शाश्वत स्वरूपाचा असतो. हा संघर्षच

जगातील सर्व दु:खांचे मुळ आहे." गौतमाने या दु:खाचे कारण शोधून काढण्यासाठी, या सामाजिक संघर्षाचे उत्तर मिळविण्यासाठी आपली प्रव्रज्या तशीच पुढे चालू ठेवली.[३६]

**ज्ञानाच्या शोधार्थ परिभ्रमण :**

खऱ्या ज्ञानाच्या शोथार्थ निघत असताना गौतमाने प्रथम आलारकालाम यांची भेट घेण्याचा निश्चय केला. वाटेतून जात असताना त्यांनी भृगुऋषीचा आश्रम पाहिला. त्या ठिकाणी त्यांनी भृगुऋषी कडून तपश्चर्येचे अनेक प्रकार पाहिले व ते आत्मसात केले. परंतु एवढ्यावरच त्यांचे समाधान झाले नाही. "ऐहिक जीवनातील दु:खाचा विचार करावा व त्यावरील उपाय शोधून काढावा अशी माझी इच्छा आहे" असे सांगून त्यांनी भृगुऋषींची परवानगी घेतली.[३७] गौतम नंतर आलारकालाम यांच्या आश्रमामध्ये वैशालीस गेला.[३८] तेथे सिद्धार्थ गौतमाने आलाकालांमाच्या मार्गदर्शनाखाली सांख्य तत्त्वज्ञान व विविध समाधिमार्गाचे शिक्षण ग्रहण केले. उद्दक रामपुत्त नावाच्या योग्याकडूनही गौतमाने समाधी अवस्थेच्या सातव्या मार्गाचे शिक्षण ग्रहण केले, त्यास "नैवसंज्ञानायतनसमाधि"[३९] असे म्हणतात. त्यांनतर पुढे गौतम मगध देशामध्ये गेले व तेथे त्यांनी अतिशय खडतर आणि कष्टप्रद ध्यानमार्गाची प्रक्रिया आत्मसात केली.

गौतमाने सांख्य तत्त्वज्ञान आणि समाधिमार्गाची कसोटी पार केल्यानंतर वैराग्य मार्गाच्या कसोटीचे ग्रहण करण्याचे ठरविले. त्यासाठी सिद्धार्थ गौतम गयानगरीस गेला व तेथे त्यांनी उरूबेला येथे नैरंजना नदीच्या काठी अभ्यास व योगधारणेस सुरूवात केली.[४०] या ठिकाणी त्यांना ज्यांनी कोलीय आणि शाक्य यांच्यातील शांततेची वार्ता आणली होती ते पाच परिव्राजक भेटले व ते गौतमाचे सहकारी बनले. वैराग्याची कसोटी अतिशय खडतर आणि कष्टप्रद होती. या कसोटीमध्ये गौतमाचे शरीर अतिशय अशक्त बनले. ते अगदी हाडांचा सापळाच बनले. त्यामुळे विचारांती गौतमाने या मार्गाचा त्याग केला आणि सुजाताच्या[४१] हस्ते अन्न भक्षण केले. तेव्हा त्यांच्याबरोबर असलेले ते पाच तपस्वी सहकारी त्यांच्यावर रागावले आणि गौतम भ्रष्ट झाला म्हणून त्यांना सोडून निघून गेले.

**ज्ञानप्राप्ती आणि नव्या मार्गाची दृष्टी :**

अन्नभक्षण केल्यानंतर गौतमाने ताजातवाना झाल्यानंतर ज्ञानप्राप्तीचा निश्चय करून उरूबेला सोडली आणि गयेला[४२] येवून एका पिंपळ वृक्षाखाली ध्यानधारणा सुरू केली. गौतमाची ही ध्यानधारणा चार आठवडे सुरू होती. सदर काळात गौतमाला ज्ञानप्राप्ती होणार हे समजल्यामुळे मारांनी (वाईट वासना) त्याच्यावर आक्रमण केले परंतु; गौतमावर त्याचा काही ही परिणाम झाला नाही. समाधि काळात गौतमाला फार संघर्ष करावा लागला, याचे वर्णन उत्तर कालीन पाली साहित्य आणि बौद्ध संस्कृत साहित्यात मिळते. थॉमसनने आपल्या "द लाईफ ऑफ बुद्धा" या ग्रंथात सदर घटना ही कथात्मक विकासाचा परिणाम[४३] मानली आहे व ओल्डेनबर्ग आणि सेनार्तने देखील त्याचे समर्थन केले आहे.

चौथ्या आठवड्याच्या शेवटी गौतमाला ज्ञानप्राप्ती झाली. जगामध्ये दोन समस्या आहेत, त्याम्हणजे अनुक्रमे १) जगात दु:ख आहे व २) हे दु:ख कसे नाहीसे करावे व मानव जातीला कसे सुखी करावे. या दोन प्रश्नावर चिंतन करून गौतमाने दु:ख निवारणाचा मार्ग शोधून काढला. यालाच गौतमाची सम्यक संबोधी[४४] (खरी ज्ञानप्राप्ती) असे म्हणतात. या दिवसापासून सिद्धार्थ गौतम "बुद्ध" बनला व गौतम बुद्ध ज्या पिंपळवृक्षाखाली समाधीसाठी बसले होते, तो "बौधीवृक्ष"[४५] म्हणून ओळखला जावू लागला.

**गौतम बुद्धांची शिकवण आणि कार्य :**

गौतम बुद्धांनी आपणास प्राप्त झालेल्या ज्ञानावर काही काळ चिंतन करून त्याचा प्रसार करण्याच्या कार्याला सुरूवात केली. बौद्धधर्माच्या इतिहासामध्ये गौतम बुद्धाच्या जीवनचरित्राबरोबरच त्यांच्या धर्माच्या शिकवणूकीला ही महत्त्वाचे स्थान आहे. गौतम बुद्धांनी आपला उपदेश सामान्य माणसापर्यंत पोहचावा, यासाठी पाली भाषेचा वापर केला. आपला उपदेश जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी आपल्या शिष्यांना तयार केले व त्यांच्यावर ती जबाबदारी सोपविली. गौतम बुद्धांनी धम्मसंघाची स्थापना केली. धम्मसंघात सर्वांना समान प्रवेश व समान अधिकार होते.

धम्मसंघाची घटना ही लोकशाही तत्त्वावर आधारलेली होती. गौतम बुद्धांनी धम्माच्या प्रचार व प्रसारासाठी जागोजाग बौद्धविहार बांधले.

गौतम बुद्धाच्या शिकवणूकीसंदर्भातील माहीती मिळविण्यासाठी 'सुत्तपिटक' हा ग्रंथ उपयुक्त ठरतो. जगातील सर्व मानवांच्या दु:खाचे मुळ कारण तृष्णा किंवा आसक्तीच आहे, असे सिद्धार्थ गौतमाचे स्पष्ट मत होते. तृष्णेचा विरोध केल्यासच खऱ्या ज्ञानाची प्राप्ती होते. या ज्ञानप्राप्तीसाठी यज्ञीय कर्मकांडाची जरूरी नाही. केवळ सदाचार ज्ञानप्राप्तीची आधारशीला आहे असे गौतम बुद्धाचे स्पष्ट मत होते.

"सब्बपापस्स अकरणं कुसलस्स उपसम्पदा ।[४६]

स-चित्तपरियोदपनं, एतं बुद्धान सासनं ।।"

(सर्व पापाचा त्याग, सर्व पुण्यकर्माचा संचय व तसेच चित्त सदैव निर्मळ व पवित्र राखणे हे बुद्धाचे अनुशासन आहे.)

या धम्मपदातील वचनातच गौतम बुद्धाच्या शिकवणूकीचा सार सामावलेला आहे.

गौतम बुद्धाची शिकवण त्यांच्या चार आर्यसत्यामध्ये सामावलेली आहे. ही त्रिकालाबाधित व दीर्घकाळ टिकणारी आर्यसत्ये पुढीलप्रमाणे –

**चार आर्यसत्ये[४७]-**

बौद्ध धर्माच्या शिकवणूकीत आर्यसत्ये व अष्टांगमार्ग याना फार महत्त्वाचे स्थान आहे. बौद्ध भिक्षू व भिक्षूणी तसेच गृहस्थाश्रमात राहणाऱ्या उपासकांनी या आर्यसत्ये व अष्टांग मार्गाचे पालन करणे अत्यंत आवश्यक मानले आहे.

**अ) दु:ख :** मानवी जीवन दु:खाने भरलेले असून सुख हे क्षणभंगूर असते. दु:ख दीर्घकाळ टिकणारे व मृत्यूनंतरही अस्तित्त्वात असते.

**ब) दु:खसमुदाय :** जीवनातील दु:खाची उत्पत्ती सहेतुक असते. दु:खाचे मुळ कारण तृष्णा किंवा लालसा होय. तृष्णा तीन प्रकारची असते. जीवनाबद्दल आसक्ती बाळगणारी भवतृष्णा, कामवासनेची कामतृष्णा व वैभवाची अपेक्षा धरणारी तृष्णा, या तृष्णेची किंवा लालसेची पुर्तता कधीच होत नाही. तिच्या पूर्ततेसाठी मानव जितका अधिक प्रयत्न करतो, तितका तो दु:खी होत असतो.

**क) दु:ख निरोध :** दु:खापासून सुटका करून घेणे म्हणजेच विमुक्ती करणे होय. यालाच दु:ख निरोध असे म्हणतात. दु:खाचे कारण म्हणजे तृष्णा नष्ट केल्यास दु:ख आपोआप नाहीसे होते.

**ड) दु:ख समुदाय निरोध मार्ग :** दु:खाचे कारण तृष्णा नष्ट करण, अवघड असले तरी अशक्य मात्र नाही. त्यासाठी यज्ञीय कर्मकांड किंवा जैनपरंपरेनुसार शरीरक्लेश हा मार्ग उपयुक्त नाही असे गौतम बुद्धांनी सांगितले. हे दु:ख नष्ट करण्यासाठी दैनंदिन जीवनातील सदाचारावर आधारलेला अष्टांग मार्ग सांगितला.

**अष्टांग मार्ग -** [४८]

बौद्ध धर्माच्या शिकवणूकीचा सार म्हणजे 'अष्टांग मार्ग' होय. अष्टांगमार्गाच्या द्वारे गौतम बुद्धांनी नीतीला व सदाचाराला विशेष महत्त्व दिले. त्याग, धैर्य, औदार्य, समानता, प्रामाणिकपणा, क्षमा, दया, शांती इत्यादीनुसार आचरण करण्याची त्यांनी सर्वांना आज्ञा दिली. अष्टांग मार्गाच्याद्वारे गौतम बुद्धांनी मानवाच्या दैनंदिन जीवनातील शुद्ध आचार व विचाराला तसेच कृतीला महत्त्व मिळवून दिले. अष्टांग मार्गात पुढील घटकांचा समावेश होतो.

**१) सम्यक् दृष्टी :**

सम्यक म्हणजे योग्य, योग्य दृष्टी कशी असावी याचे विवरण येथे आहे. सत्य जाणणे, सद्सदविवेक बुद्धीचा विकास झाल्याने मानव पाप व पुण्य, सत्य व असत्य यात भेद करतो. अहंकार नष्ट होवून विचारी वृत्ती वाढते व चित्तशुद्धी होते.

**२) सम्यक् संकल्प :**

शुद्ध विचार विकसित करणे. त्यामुळे राग, लोभ नष्ट होवून ऐश्वर्य, सत्ता, कामोपभोग याबद्दलची तृष्णा नष्ट झाली पाहिजे.

**३) सम्यक् वाक् :**

सत्य बोलावे, निंदा करू नये, चांगला संकल्प करावा, वाणीही शुद्ध व चांगली ठेवावी.

**४ ) सम्यक् कर्मात :**

सत्कर्म करणे, चोरी व दुराचार न करणे, हिंसा, व्याभिचार यापासून दूर राहून आपल्या कर्माचा अंत करावा.

**५ ) सम्यक् आजीव :**

सदाचार व सन्मार्गानेच मिळालेल्या संपत्तीवरच उपजीविका करावी. अप्रामाणिकपणे व लाचारीच्या मार्गाने काहीही मिळवू नये.

**६ ) सम्यक् स्मृती :**

आत्मसंयमन करावे, विवेकी रहावे, इंद्रियावर ताबा ठेवावा.

**७ ) सम्यक् व्यायाम :**

मनातील दुष्ट वासनांचे दमन करून सुविचार व सद्विचाराची जोपासना करावी. मानसिक, नैतिक व आध्यात्मिक उन्नत्तीसाठी प्रयत्नशील राहावे.

**८ ) सम्यक् समाधी :**

एकाग्रता वाढवावी. ध्यानस्थ होवून संबोधीज्ञान प्राप्ती करावी. साधकाने समाधी साधना सुरू केल्यावर त्याचे मन संशयापासून मुक्त होवून चित्तात शांती व समाधान नांदते. त्यामुळे साधकाला मोक्षप्राप्ती होते.

गौतम बुद्धांनी वरील आर्य सत्ये व अष्टांग मार्गाच्या शिकवणूकीत कोणत्याही धार्मिक आचार किंवा विधीला महत्त्व दिले नव्हते, तर मानवाने आपले दैनंदिन जीवन जगताना कोणत्या तत्त्वांचे पालन करावे, कोणत्या विचारांचा विकास करावा, तसेच कोणत्या विचारांपासून दूर रहावे. आत्मसंयमन, सदाचार, सद्विचार यांच्याच विकासाला कसे प्राधान्य द्यावे. या विचारांचे यामध्ये सखोल विश्लेषण केलेले दिसून येते.

**पंचशील :**

गौतम बुद्धांनी आपल्या धर्माच्या अनुयायांना दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरणारे काही नैतिक नियम घालून दिले, त्यांनाच 'पंचशील' असे म्हणतात, ते पुढीलप्रमाणे आहेत.

१ ) **अहिंसा** - कोणत्याही प्राणीमात्राची हिंसा करू नये.

२ ) **सत्य** - असत्य संभाषण किंवा विचारांचा पूर्णपणे त्याग करावा.

३ ) **अस्तेय** - जे आपल्या मालकीचे नाही किंवा आपल्यास दिले नाही त्याची अभिलाषा धरू नये.

४ ) **ब्रह्मचर्य** - ब्रह्मचर्य तत्त्वाचे कोटेकोरपणे पालन करावे.

५ ) **अपरिग्रह** - कोणत्याही मादक पदार्थाचे सेवन करू नये. किंवा अनावश्यक बाबींचा संग्रह करू नये.

गौतम बुद्धांनी चार आर्यसत्ये, अष्टांग मार्ग व पंचशील तत्त्वे याआधारे आपल्या शिष्यगणाला उपदेश केला व हिच शिकवण सांगितली. त्यांनी आपल्या शिकवणूकीत सदाचाराला प्राधान्य दिले. आत्यंतिक कामभोग व आत्मक्लेश हिंसा व अहिंसा, ज्ञान वा कर्मउच्छेदवाद वा शाश्वतवाद अशा सर्व अतिरेकापासून गौतमाने आपला मार्ग दूर ठेवला होता. म्हणूनच गौतम बुद्धाच्या शिकवणूकीला 'मध्यममार्ग' असे म्हणतात. प्रत्येकाने आपले शील उच्च ठेवावे, संन्यस्त वृत्तीने राहावे, तत्त्वचिंतन करावे, पुण्यकर्मे करावीत हा गौतम बुद्धांच्या शिकवणूकीचा सार होता.

**गौतम बुद्धांचे महापरिनिर्वाण :**

भगवान गौतम बुद्ध वयाच्या ८० वर्षाच्या अवस्थेपर्यंत धर्मप्रचारार्थ भटकत राहिले. महापरिनिब्बान सुत्तानुसार महापरिनिर्वाणाच्या वेळी गौतम बुद्ध वैशालीच्या जवळ वेलुग्रामात होते. त्यावेळी ते अत्यंत रोगग्रस्त झाले. तेव्हा त्यांचे शिष्य अत्यंत चिंतातुर झाले. अशा अवस्थेतही गौतम बुद्ध कशा तरी रीतीने पावाला पोहचले. तेथे चुन्द कम्मारपुत्ताच्या घरी सुक्कर मद्दव[४४] (डुकराचे मांस) खाल्ल्याने त्यांना रक्तातीसाराचा त्रास सुरू झाला. तरीपण त्यांनी कुशीनाराच्या दिशेने प्रस्थान चालूच ठेवले. मध्यंतरीच हिरण्यवती नदी पार करून शालवनात पोहचताच अधिकच अस्वस्थ झाले. अंतिम क्षण आल्याचे लक्षात येताच त्यांनी आपल्या शिष्यांना भावी रीती-नीतिच्या संदर्भात मार्गदर्शन केले. आणि रात्रीच्या तिसऱ्या प्रहरामध्ये तथागताचे महापरिनिर्वाण झाले. त्यादिवशी वैशाखी पौर्णिमा होती.

भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणाची तिथि देखील विवादाग्रस्त आहे. ह्या संदर्भात देखील दोन परंपरा आहेत.[४५]

१) एक परंपरा इ.स. पूर्व ४८७-४७७ च्या दरम्यान बुद्धाचे परिनिर्वाण झाल्याचे मानते.

२) दुसरी परंपरा इ.स. पूर्व ५४४-५४३ च्या दरम्यान बुद्धाचे परिनिर्वाण झाल्याचे मानते.

गौतम बुद्ध हे प्राचीन भारतामध्ये उदयास आलेले एक अलौकीक, तेजस्वी व ज्ञानी व्यक्तिमत्त्व होते. गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माची स्थापना करून संपूर्ण मानवजातीला एक नवा मार्ग दाखविला. गौतम बुद्धांनी आपल्या शिकवणूकीतून, आपल्या प्रवचनामधून अनेक महत्त्वाच्या सामाजिक, राजकीय व धार्मिक गोष्टीसंदर्भात मार्गदर्शन केले. ते त्यांचे विचार आज ही उपयुक्त वाटतात. व आज गौतम बुद्धाच्या मार्गाचे मानव जातीने अनुसरन केल्यास, मानवाला शांती, समाधान मिळेल.

## संदर्भ ग्रंथ सुची


१) गर्दे दि. का. -"प्राचीन भारतीय राज्यविचार", म.रा.वि. ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे-३०, १९७९, पान नं. १४२.

२) डॉ. भागचंद्र भास्कर - "भारतीय संस्कृतीला बौद्धधर्माचे योगदान", कुलसचिव, नागपुर विद्यापीठ, नागपुर, मार्च १९७७, पान नं. २२.

३) डॉ. डांगे सिन्धु - "बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान", म.रा.वि. ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर,पुणे-३०, १९८०, पान नं. २०.

४) कित्ता - वरीलप्रमाणे पान नं. २०.

५) कित्ता - वरीलप्रमाणे पान नं. २०.

६) कित्ता - वरीलप्रमाणे पान नं. २३.

७) डॉ. आंबेड्कर बाबासाहेब - "भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म", पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई, तृतीय आवृत्ती, १९७८, पान नं. ६.

८) डॉ. ओल्डेनबर्ग हेरमन - "बुद्धा : हिज लाईफ, हिज डॉक्टरीन, हिज ऑर्डर", इंडोलॉजीकल बुक हाऊस, वाराणसी, १९७१, पान नं. ९५.

९) कित्ता ३ प्रमाणे - पान नं. २२

१०) कित्ता २ प्रमाणे - पान नं. २३

११) सुत्तानिपात - ३१.१८.१८

१२) महावग्ग (विनय) सुत्त - ३.१.१८-२०, पृष्ठ क्र. ८६, शुद्धोदानाचे शुक्लोदन, शाक्यदोन, धोतोदन आणि अमितोदन ह्या ४ सहोदरांची नांवे प्राप्त होता. (माज्झिम चुलदुक्खक्खन्ध सुत्त अट्ठकथा) येथे तथागताच्या एका भावाचे नाव प्राप्त होते. नन्द, जो शुद्धोदनापासून महाप्रजापती गौतमीच्या पोटी जन्मला.

१३) दीघनिकाय - भा-२, पान नं. ८.

१४) सुत्तनिपात - ३.७

१५) डॉ. आंबेडकर बाबासाहेब - "भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म", पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई, तृतीय आवृत्ती, १९७८, पान नं. १५.

१६) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. १०,११.

१७) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. १३.

१८) कोसंबी धर्मानंद – "बुद्धलीला", सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई, ४०० ०१४, तृतीय आवृत्ती, २००७.

१९) डॉ. सौ. डांगे सिन्धू – "बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान" म.रा.वि. ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे-३०, १९८०, पान नं. २४.

२०) कित्ता १५ प्रमाणे – पान नं. २२.

२१) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. २२.

२२) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. २३.

२३) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. २३.

२४) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. २४.

२५) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. २७.

२६) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. २७-२८.

२७) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. २८.

२८) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. २८.

२९) कित्ता २ प्रमाणे – पान नं. २६.

३०) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ४२.

३१) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ४९.

३२) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ५१.

३३) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ५२.

३४) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ५४.

३५) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ५६.

३६) कित्ता १८ प्रमाणे

३७) कित्ता २६ प्रमाणे – पान नं. ५८.

३८) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ६१.

३९) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ६२.

४०) कित्ता क्रमांक २९ प्रमाणे – पान नं. २८.

४१) कित्ता २६ प्रमाणे – पान नं. ६४.

४२) कित्ता २६ प्रमाणे – पान नं. ६५.

४३) कित्ता २९ प्रमाणे – पान नं. ३४.

४४) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ३४.

४५) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ३५.